**महाराष्ट्र शासन**

**तात्काळ /कालमर्यादा /ई-मेल**

क्रमांक : एसएलएस-२०२१/(प्र.क्र. ३४/२०२१)/आ(वर्ग-२),

E-Mail : doesttclass2.wrd@maharashtra.gov.in

जलसंपदा विभाग,

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४१४५

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०६/०७/२०२१

प्रति,

जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक
सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे, जलसंपदा विभाग
आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद
जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता
अधीक्षक अभियंता व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे
अधीक्षक अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे / पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती
अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे.

**विषय :- सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांना उपविभागीय अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नती देणेबाबत सन २०२०-२०२१ ची निवडसूची.**

**संदर्भ** :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२०२१.

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्य शासनातील दिव्यांग अधिकारी/कर्मचाऱ्यांना गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नतीमध्ये ४% आरक्षण विहित करण्यात आले आहे. सदर ४% आरक्षण पुढील "अ", "ब" आणि "क" या दिव्यांग प्रकारांसाठी प्रत्येकी १% तसेच "ड" व "इ" या प्रकारांसाठी १% , या प्रमाणात देण्यात आले आहे.

**अ)** अंध/अल्पदृष्टी

**ब)**कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता

**क)** अस्थीव्यंगता/मेंदूचा पक्षाघात (cerebral palsy)/कुष्ठरोग मुक्त(Leprosy cured)/ शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims)/स्नायु विकृती (Muscular dystrophy)

**ड)** स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/मानसिक आजार (Mental Illness)

**इ)** वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदांवर

२. उपविभागीय अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नतीसाठी पात्र अशा सहाय्यक अभियंता श्रेणी २ (स्थापत्य) यांची सन २०२०- २०२१ ची निवडसूची तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. या पार्श्वभूमीवर सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) संवर्गाची शासन परिपत्रक, क्रमांक : ज्येष्ठता

२०१७/(प्र.क्र. ९६/२०१७)/आ(सअश्रे-२), दिनांक ०१.०९.२०१७ अन्वये प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठतासुचीतील ज्येष्ठता क्र. १५६० पासून पुढील अभियंत्यांची यादी विचारात घेण्यात आली आहे. तरी ज्येष्ठता क्र. १५६० पासुन **उप विभागीय अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदोन्नतीसाठीची अर्हताकारी सेवा (३ वर्षे) पूर्ण करणाऱ्या दिव्यांग अभियंत्यांची पदोन्नतीच्या अनुषंगाने माहिती** सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद रकान्याप्रमाणे MS-Excel या फॉंटमध्ये माहिती टंकलिखित करून Soft Copy व Hard Copy सह दिनांक १४.०७.२०२१ पर्यंत शासनास उपलब्ध करून देण्यात यावी. उपविभागीय अभियंता (स्थापत्य) पदासाठी मागविण्यात आलेल्या अभियंत्यांची माहिती ही पदोन्नतीची पूर्वतयारी म्हणून मागविण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर शासन पत्र हे महाराष्ट्र शासन ,जलसंपदा विभागाच्या wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यावरुन या पत्राची प्रत संबंधितांनी काढून घ्यावी व माहिती विहित विवरणपत्रात दिलेल्या वेळेत सादर करावी.

(रणजित शि. अहिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत-विवरणपत्र-अ

प्रत :- आस्था (वर्ग-२) कार्यासन संग्रहार्थ.

विवरणपत्र -अ

शासन क्रमांक : एसएलएस-२०२१/प्र.क्र. ३४/२०२१/आ(वर्ग-२) दि. ०६/०७/२०२१

उपविभागीय अभियंता (स्थापत्य) पदावर दिव्यांग प्रवर्गातून पदोन्नती विचारक्षेत्रात असलेल्या सहायक अभियंता श्रेणी-२ (स्था) यांचा सेवातपशील

| अ. क्र. | जेष्ठता क्र | अधिका-याचे नाव (मराठीत संपूर्ण नाव द्यावे आद्याक्षरे देऊ नयेत.) | जन्मदिनांक (दिनांक DD-MM-YY या नमुन्यात द्यावा-) | सेवानिवृत्ती चा दिनांक | शैक्षणिक पात्रता | कनिष्ठ पदावरील नियुक्तीचा दिनांक | मूळ जात प्रवर्ग (जात/पोटजात नमूद करावी)/ | नियुक्तीचा जात प्रवर्ग | जात प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा कसे | महाराष्ट्रातील मूळ निवासी आहेत किंवा कसे? | व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | मराठी/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण आहेत काय असल्यास दिनांक | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | विभागीय चौकशी चालू/प्रस्तावित आहे किंवा कसे? असल्यास दोषारोप पत्राची प्रत उपलब्ध करून द्यावी. | स्थायित्व प्रमाणपत्र | सदर अधिका-याचे ५०/५५ वर्षाचे पुनर्विलोकन झाले आहे काय? | सन २०१५ १६ ते २०१९-२० या कालावधीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविण्यात आलेले आहेत काय, असल्यास त्याची प्रत द्यावी | दिव्यांगत्वाचा प्रकार (अ/ब/क/ड/इ) ** | दिव्यांग प्रमाणपत्र देणारे प्राधिकारी, व प्रमाणपत्राचा दिनांक, सोबत साक्षांकित प्रमाणपत्र सादर करण्यात यावे | दिव्यांगत्व शासन सेवेत प्रवेशघेण्यापूर्वी आले आहे अथवा सेवाप्रवेशोत्तर? | अधिकारी स्वत: विधवा/परितक्त्या असल्यास त्याबाबतचा पुरावा/अधिकारी किंवा त्याचे मूल मतिमंद असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा | सदर अभियंत्याने दिनांक ३१ मार्च २०२० अखेरचे मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे ? | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

****दिव्यांगत्वाचा प्रकार निश्चित करतेवेळी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-दिव्यांग २०१५/प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५.०७.२०२१ मधील तरतुदी गृहित धरण्यात याव्यात.**

<u>महत्त्वाची टिप</u> :-

(१) सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीतील मूळ गोपनीय अहवाल पाठवावेत. मूळ गोपनीय अहवाल उपलब्ध नसतील तर दुय्यम गोपनीय अहवाल पाठवावेत. अर्धवट गोपनीय अहवाल पाठवू नयेत. मागणी केलेल्या वर्षाव्यतिरिक्त जादा गोपनीय अहवाल पाठवू नयेत. प्रत्येक गोपनीय अहवालाच्या मुखपृष्ठावर संबंधित कार्यालयाचे नाव व ज्येष्ठता क्रमांक नमूद करावा.

(२) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांचे मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्राची प्रत्येकी एक जादा छायांकित प्रत प्रमाणित करुन पाठवावी. तसेच सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची व जात वैधतेबाबतची नोंद असलेल्या पानाची छायांकित प्रत प्रमाणित करुन पाठवावी.

(३) सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गाच्या अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठता यादीतील नोंद व कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांचे नांव, जात प्रवर्ग व इतर तपशिल यात काही फरक असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख माहितीमध्ये करावा.

(४) सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गाच्या अंतिमरित्या प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीतील व कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांचे नाव, जात प्रवर्ग व इतर तपशिल यात काही फरक असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख माहितीमध्ये करावा.